# ECHO OF HIS CALL

## त्याच्या बोलाविण्याचा प्रतिध्वनी MARATHI

ECHO OF HIS CALL 1969-2019 GOLDEN JUBILEE

India's National Spiritual Newspaper

₹ 10/-

Published monthly in ENGLISH, TAMIL, MALAYALAM, TELUGU, HINDI, KANNADA, MARATHI, BENGALI, GUJARATI, ODIA, ASSAMESE, PUNJABI, NEPALI, URDU, SINHALA & AFRIKAANS

Editor : S. SAM SELVA RAJ | 16 Languages | Associate Editor : Rev. Shashi Tiwari

VOL: XXII | YEAR OF OUR LORD JESUS CHRIST, OCTOBER 2020 | NO. 10


**पवित्र शास्त्र**

कृपया हा शास्त्रभाग पाठ करा

**प्रभुची स्तुती असो**

**स्तोत्र ४:१-८**

१) हे माझ्या न्यायदात्या देवा, मी तुझा धावा करितो तेव्हा माझे ऐक, मला तू पेचातून मोकळे केले आहे, मजवर कृपा कर, माझी प्रार्थना ऐक.

२) अहो महाजनहो, माझ्या गौरवाची अप्रतिष्ठा कोठवर चालणार ? तुम्हांला वायफळ गोष्टी आवडणार काय ? तुम्ही लबाडाची कास कोठवर धरणार ?

३) तरी हे ध्यानांत ठेवा की, परमेश्वराने आपणासाठी भक्तिमान इसम निवडून काढीला आहे, मी परमेश्वराचा धावा करीन तेव्हा तो ऐकेल.

४) भीती बाळगा, पाप करु नका, शय्येवर पडून आपल्या मनाशी विचार करा, स्तब्ध राहा.

५) धार्मिकतापूर्वक यज्ञ करा, परमेश्वरावर भान ठेवा.

६) आम्हांला चांगले दिवस कोण दाखविल असे म्हणणारे पुष्कळ आहेत, हे परमेश्वरा, तू आपले मुखतेज आम्हांवर पाड.

७) धान्य व द्राक्षारस यांची समृध्दी झाली म्हणजे लोकांस आनंद होतो त्यापेक्षा अधिक आनंद तू माझ्या हृदयांत उत्पन्न केला आहे.

८) मी स्वस्थपणे पडून लागताच झोपी जातो, कारण, हे परमेश्वरा तू मला एकांतात निर्भय ठेवितोस.

CHOSEN AND THE CHALLENGE !

# निवडलेले आणि आव्हान !

- बंधु एच. लामेख इनबराज

"येशूने जे प्रेषित निवडले होते त्यांस पवित्र आत्म्याच्या द्वारे आज्ञा सांगितल्यानंतर तो वर घेतला गेला" (प्रे.कृ.१:१).

१८व्या शतकात फ्रान्स आणि इंग्लंड या दोन देशांत मोठे युध्द झाले. फ्रेंच सैन्याचे नेतृत्व फ्रेंच क्रांतिचा महान असा पुढारी नेपोलीयन बोनापार्ट हा करीत होता. इंग्लंडचे नाविक दलाचे नेतृत्व कमांडर नेल्सन करीत होते. ब्रिटीश सैन्य दलाच्या प्रमुखांनी इंग्लीश नाविक दलाला नेपोलीयन बोनापार्टच्या नाविक दलाशी युध्द करुन कसेही करुन त्यांचा पराभव करण्याची आज्ञा दिली गेली. हि आज्ञा प्राप्त झाल्यानंतर नेल्सन युध्द करण्यास तयार झाला. त्या युध्दात त्याने एक पाय आणि एक डोळा गमावला, तरी देखील माघार न घेता तो निष्ठूरपणे लढत राहिला. त्याबद्दल नेपोलीयनने देखील त्याचे कौतुक केले. नेल्सनला दिलेल्या आज्ञेचे पालन करण्याच्या त्याच्या समर्पितपणा पाहून नेपोलीयन अंचबित झाला अशी इतिहासात नोंद करण्यात आली आहे.

नेल्सन त्याच्या जगीक अधिकाऱ्याने दिलेल्या आज्ञेचे पालन करण्यात समर्पित होता. आपण प्रत्येकजण राजांचा राजा आणि प्रभुचा प्रभु याने आपणाला दिलेल्या महान सेवेच्या आज्ञेबद्दल किती समर्पित आहोत ? जगीक अधिकाऱ्याच्या आज्ञेचे पालन केल्याबद्दल नेल्सनला इतिहासात एक विशेष स्थान मिळू शकले. आपण जर प्रभु परमेश्वराच्या आज्ञेचे पालन केले तर तो इतिहासात आपल्याला किती मान-सन्मान देईल ? बायबल मध्ये विश्वासू सेवकाला मोबदल्याचे आश्वासन देत आहे. "त्याला त्याच्या धन्याने म्हटले, शाबास, भल्या व विश्वासू दासा, तू थोडक्याविषयी विश्वासू झालास, मी तुझी पुष्कळांवर नेमणूक करीन, आपल्या धन्याचे सुख भोगावयास ये". (मत्तय २५:२१).

काही महिन्यांपूर्वीच आपण पुनरुत्थान दिन साजरा केला. त्यामुळे आपल्या पुनरुत्थीत प्रभुने त्याच्या शिष्यांना ज्या काही आज्ञा दिल्या त्यावर मनन करणे योग्य होईल. या आज्ञा केवळ शिष्यांनाच देण्यात आल्या नव्हता, तर ख्रिस्ताच्या सर्व लोकांकरिता देण्यात आल्या होत्या. जर

*(पान ३ वर .....)*

१९६९ पासून शिक्षणाद्वारे जिवांना स्पर्श करणारे

# त्याच्या बोलाविण्याचा प्रतिध्वनी

मासिक प्रकाशन - इंग्रजी,तमीळ,मल्यालम,तेलगु,हिन्दी,मराठी,कन्नड,बंगाली,गुजराती,उरीया,नेपाली,आसामी,पंजाबी,उर्दु सिंहाला आणि अफ्रिकन

ECHO OF HIS CALL
1969-2019
GOLDEN JUBILEE



**"…. भिऊ नको, कारण मी तुला सोडविले आहे. मी तुला तुझ्या नावाने हाक मारिली आहे. तू माझा आहेस". (यशया ४३:१).**

ख्रिस्त येशूमधील मित्रांनो,

आम्ही आपल्या प्रभु व तारणाऱ्या येशू ख्रिस्ताच्या मधुर नामात तुम्हाला शुभेच्छा देत आहोत.

आम्ही जेव्हा मागील ५० वर्षांच्या सेवाकाळाकडे मागे पहातो आणि प्रभु परमेश्वराने ज्या अभ्दूत प्रकारे आम्हांस चालविले ते पाहून आमचा आनंद ओसंडून वाहातो. आम्ही **एको ऑफ हिज कॉलचा** संपूर्ण कार्यकारी संघ तुम्हा सर्वांना या नम्र सेवाकार्याद्वारे देव राज्याच्या वाढीकरिता जे सहकार्य केले, आधार दिला त्या बद्दल आम्ही शतशः धन्यवाद देत आहोत.

देवाने आमच्या मुख्य मंडळीत दि. ९ ऑगस्ट ते ११ ऑगस्ट या तीन दिवसांतील सुवर्ण महोत्सवी सभा आशीर्वादीत केल्या. आमच्या ज्या सर्व मित्रांनी त्यांच्या विशेष प्रार्थनांच्या, अभिनंदनाच्या, स्वेच्छादानाच्या द्वारे उत्तेजन दिले त्या सर्वांचे आम्ही आभार मानीत आहोत. आम्ही सर्व मान महिमा आणि गौरव आपल्या प्रभु येशू ख्रिस्ताला देत आहोत.

या अंकात आम्ही आमच्या **सेंट पॉलस् मॅट्रीक्युलेशन स्कुल,** जी चैन्नाई शहराच्या एका उपनगरात ५०० पेक्षा अधिक मागास वर्गीय मुले शिक्षण देत आहे. तिच्या बद्दल थोडक्यात माहिती देत आहोत. या शाळेतील विद्यार्थी मागील अनेक वर्षांपासून शासकीय शालान्त परिक्षेत उत्तम गुण संपादन करुन उत्तीर्ण होत आले आहेत.




हि शाळा २२ वर्षांपूर्वी सुरु झालेली असल्यामुळे, आता इमारतीच्या भिंतीची दुरुस्ती करणे, जमिनीच्या लाद्या बदलणे व इमारतीला रंग देणे गरजेचे आहे. येथील हवामान अत्यंत उष्ण असल्यामुळे आम्हाला वर्गाताली वातावरण थंड ठेवण्याकरिता पुष्कळसे पंखे बसविणे आवश्यक आहे. आम्ही शाळेत आणखीन अनुभवी शिक्षकांची नेमणूक करण्याच्या प्रक्रियेत आहोत. विद्यार्थ्यांना उच्च प्रतिचे शिक्षण देण्याचे आमचे उद्दीष्ट गाठण्यांकरिता आम्हांला आर्थिक मदतीची गरज आहे. त्यामुळे तुम्हा सारख्या प्रियजनांच्या प्रार्थनांची आणि आधाराची आम्ही अपेक्षा करीत आहोत.

प्रभु परमेश्वर आमच्या **नहेम्या बायबल कॉलेजला** आशीर्वाद देत आहे. सध्या एकूण ५० विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. आम्ही विद्यार्थ्यांकरिता १७ ऑगस्ट रोजी "मानवी जीवनात देवाचे पाचारण" या विषयावर एक शिबीर आणि आमच्या मंडळीच्या पुढाऱ्यांकरिता व बायबल कॉलेजच्या विद्यार्थ्यांकरिता दि. २४ ऑगस्ट रोजी रिट्रीट (शांत समय) आयोजीत केली होती.

आमच्या मंडळ्या चांगले फळ देत आहेत. आमच्या मुख्य मंडळीत ३ आणि ४ ऑगस्ट रोजी विशेष सभेचे आयोजन केले होते. उपस्थितांना देवाने आशीर्वादीत केले.

आमचे शुभवर्तमान मुद्रणालय तासाला १०,००० प्रती छापते. आणि त्यामुळे आम्हाला वेगवेगळ्या भाषांमध्ये हजारो प्रती छापून त्या विमामूल्य वितरणाकरिता मिशन क्षेत्रांमध्ये पाठविणे शक्य होत आहे.

हे संपादकीय वाचल्याबद्दल आभारी आहे. आमची खात्री आहे की देव तुम्हाला या सेवाकार्यात सर्व शक्य मार्गाने आमच्या सोबत सहभागी होण्यास प्रेरीत करील. आम्ही प्रभुमध्ये तुम्हावर प्रिती करितो आणि तुम्हाकरिता प्रार्थना करीत आहोत. कृपया आम्हांकरिता देखील प्रार्थना करीत राहा.

देव तुम्हाला विपुल आशीर्वाद देवो.

ख्रिस्त येशूमध्ये तुमचा दास

**एस. सॅम सेल्वा राज.**

**CHIEF EDITORS**
Pastor S. Sam Selva Raj
Angeline Selvakumari Henry, M.A., M.Ed.

**MANAGING EDITOR**
Pastor Alex Samson Sam, B.Th., M.Div.

**ADMINISTRATION**
Bro. N. Prakasam, M.A., General Manager

**EDITORIAL BOARD**
Sis. Jesy Veena Sam
Bro. M. Paulraj, M.A., B.Ed.
Sis. Serena Bevin, M.A., M. Phil., B.Ed.

**ADVISORY BOARD**
Adv. Jose Abraham
Adv. N. Balaji, B.Com., B.L.
Dr. S. Rabinder Boaz, M.S.
Er. C.G.S. Baburao, B.Tech., M.Tech. (DM)
Aud. K. Puratchivendan, M.Com., B.L.
Bro. Rajeswaran Samuel, B.Com.

**PUBLISHER & PRINTER**
Pastor S. SAM SELVA RAJ
**Echo of His Call Printers**
10, Mohammed Abdullah 2nd Street,
Chepauk, Chennai- 600 005, India.
**Phone :** (+91-44) 2852 8282
2852 9293, 2854 7766
**Email :** sam@echoofhiscall.org
biblecor@yahoo.co.in
**Websites :**
www.echoofhiscall.org
www.echoofhiscall.com

**Our Ministries:** ECHO OF HIS CALL Monthly Magazines (16 languages) BIBLECOR - Postal Courses (3 languages) Theological Correspondence Courses (2 languages) Church Planting Nehemiah Bible Colleges Gospel Printing Press Great Commission Partners Village English High School Crusades 100 Prayer Warriors Community Development

*(पान १ वरुन .....)*

संपूर्ण जगभरात ३ अब्ज ख्रिस्तीजन असतील, त्या प्रत्येकांकरिता त्या आज्ञा देण्यात आल्या आहेत. तव्दतच भारतातील ३ कोटी ख्रिस्ती जनांतील महान आज्ञाचे पालन करुन प्रत्येकाने ३० सह देशवासी यांना शुभवर्तमान सांगितले. तर संपूर्ण देशाला ख्रिस्ताची ओळख होईल. देव करो आणि आपल्याला येशू ख्रिस्ताने दिलेल्या महान आज्ञेचा अर्थ कळो, "यास्तव तुम्ही जाऊन सर्व राष्ट्रांतील लोकांस शिष्य करा, त्यांस पित्याच्या, पुत्राच्या व पवित्र आत्म्याच्या नामाने बाप्तिस्मा द्या..." (मत्तय २८:१९).

**(१) आज्ञा म्हणजे काय ?**

**(अ) अर्थ**

**(ब) वैशिष्टय - स्वरुप आणि**

**(क) संधी किंवा कृतिकक्षा**

**(२) आज्ञांचे कारण ?**

**(अ) जुन्या कराराचा दृष्टीकोण**

**(ब) नव्या कराराचा दृष्टीकोण**

**(क) समकालीन दृष्टीकण**

**(३) शेवट किंवा अनुमान**

**(१) आज्ञा म्हणजे काय ?**

**(अ) अर्थ :-** आपल्याला ठाऊक आहे की बहुतेक करुन आज्ञा ही वरिष्ठ अधिकाऱ्यां कडून त्याच्या खालच्या कनिष्ठाला देण्यात येते आणि आपल्याला हे देखील माहित आहे. सर्व साधारणपणे तिचा उपयोग संरक्षण खात्यात किंवा सैन्यदलात करण्यात येत असतो आणि आज्ञेसंबधी सर्वसाधारणपणे असे समजले जाते की ती दुर्लक्षिली जाऊ शकत नाही तर तिचे पालन करणे बंधनकारक असते.

नव्या करारातील येशूने शिष्यांना दिलेल्या आज्ञेच्या ग्रीक "Enteilamenos" शब्दाचा अर्थ "दिशा उपलब्ध करणे", "दिशा देणे" असा होतो. त्यामुळे देवाच्या प्रत्येक लेकराने न चुकता एक सत्य समजून घेतले पाहिजे आणि येशूने त्याला आज्ञा पुरविल्या आहेत. या विश्वासात त्याने आनंदीत झाले पाहिजे. त्याने स्पष्ट अशी दिशा पुरविली आहे.

### (ब) आज्ञेची वैशिष्टय अशी भूमिका - स्वरुप

#### (i) कर्तव्याचे बंधन :-

आज्ञा ही सर्वसाधारणत: वरिष्ठाद्वारे कनिष्ठाला देण्यात येते. आज्ञा ही संवाद, विनंती आणि विनवणी यापेक्षा वेगळी असते. ती कर्तव्याबाबचे बंधन असते. आज्ञा अधुरी - अपूर्ण सोडता येत नाही. ती पूर्ण करावी लागते. पूर्ण पालन करावे लागते.

#### (ii) काळ मर्यादीत :-

आज्ञा ही विशिष्ठ वेळेसाठी असते. दिलेले काम किंवा जबाबदारी नेमून दिलेल्या ठरलेल्या वेळेत केले गेले नाही तर त्याची किंमत - महत्व कमी होते. उदाहरणार्थ, जर सैन्याने प्रतिकात्मक आज्ञा ही ठरलेल्या वेळेत पूर्ण केली नाही - तडीस नेली नाही तर - शत्रू हल्ला करील आणि विरुध्द सैन्याचा नाश करील. त्यामुळे आज्ञेचे पालन केले पाहिजे आणि तेही विशिष्ठ वेळेत.

#### (iii) कार्य केंद्रित :-

काळ मर्यादा आणि लोक यांच्या सहभागा व्यतिरिक्त त्यामध्ये एक विशिष्ठ अवघड काम देखील पूर्ण करावयाचे असते. प्रत्येक ख्रिस्ती व्यक्तिच्या उद्देश केवळ अस्तिव नाही. तर शुभवर्तमान प्रसाराचे कार्य करण्यात स्वत:स तयार करणे हा आहे. येशू आज्ञेत शुभवर्तमान गाजविणे - सुवार्ता संदेश देणे आणि विश्वासणाऱ्यांना बाप्तिस्मा देणे हे स्पष्ट काम निर्देशीत करीत आहे.

### (क) आज्ञेची व्याप्ति - कृतिकक्षा :-

आज्ञा ह्या नेहमीच सीमाकक्षेपर्यंत बंधनकारक असते. संरक्षण यंत्रणेत व पुष्कळशा आज्ञा असतात. एक विशिष्ठ कमांडर केवळ सैनिकांच्या एकाच गटाला दिलेल्या प्रदेशातच हालचाली करण्याची कदाचीत आज्ञा देईल.

तरीसुध्दा, आपल्या प्रभु येशू ख्रिस्ताने आपल्याला दिलेल्या आज्ञेचे सामर्थ्य संपूर्ण पृथ्वीसाठी आहे. त्याचे सामर्थ्य दुष्टतेवर, उच्च स्थानांवर आणि अधोलोकात आहे. येशूने म्हटले, "सर्व राष्ट्रात जा". येशूने दिलेली आज्ञा ही सर्व भाषा, संस्कृती, जात, वर्णभेद, धर्म इत्यादींच्या सीमेपलीकडे आहे. आणि ती सर्वांना देण्यात आलेली आहे. कोणीही ख्रिस्ती व्यक्ति तीमधून वगळलेली नाही. सर्व ख्रिस्तीजनांनी ख्रिस्ताने दिलेल्या - आज्ञेचे पालन करण्यास सहभागी झाले पाहिजे.

भारत देश हा कापणीकरिता पिकून तयार असलेली भूमि आहे. हा सर्वात मोठा देश असून अनुयायी - शिष्य बनविण्याकरिता भरपूर लोक असलेला देश आहे. जगातील ८० टक्के शुभवर्तमान न पोंहचलेले लोक येथे आहेत. यामुळे महान आज्ञा प्राप्त झालेल्या देवाच्या प्रत्येक लेकरांने उठून शुभवर्तमान गाजविण्याच्या सागरात सामील झाले पाहिजे.

### जुन्या करारातील आज्ञा :-

जुन्या करारातील आज्ञा ही देवाचा सेवक मोशे याच्याद्वारे इस्त्राएलच्या लेकरांना देण्यात आली होती. ती "दहा आज्ञा" म्हणून सर्वपरिचीत आहे. ती देखील सकारात्मक आणि नकारात्मक अशा दोन भागात विभागलेली आहे. आज्ञेचे बारकाईने निरीक्षण आणि अज्ञान म्हणजे आशिर्वाद किंवा शाप यांना निमंत्रण देण्यासारखे आहे. निर्गम २०:३-१७ या वचनात आज्ञा कथन करण्यात आलेले आहेत. देव पुन:उच्चार करुन असे सांगत आहे की, "तुम्ही माझ्या बरोबरीला दुसरे देव करु नका, आपल्यासाठी सोन्या रुप्याचे देव करु नका. माझ्यासाठी एक मातीची वेदी करा आणि तिजवर शेरडांमेंढरांचे व गुराढोरांचे होम आणि शांत्यर्पणे करा, जेथे जेथे माझे नामस्मरण व्हावे असे मी करीन तेथे तेथे मी येऊन तुम्हांस आशीर्वाद देईन" (निर्गम २०:२३-२३).

जुन्या करारातील आज्ञांचा ज्याला नियम किंवा कायदा आणि इब्री भाषेत "तोरा" म्हटले आहे. त्याचा उद्देश एक ईश्वरवादाची कल्पना प्रस्थापित करणे हा होता. त्याचा अर्थ देवत्व केवळ एक आहे, जो संपूर्ण सृष्टीचा आणि मनुष्यप्राणीचा निर्माणकर्ता आहे. मनुष्य जाती, नीतितत्वे आणि सद्सद्विवेक बुध्दि यांचे पालन करण्यात अपयशी ठरल्यामुळे त्यांना आज्ञा

पुरविण्यात आल्या होत्या. सद्सद्विवेक आणि सहभागिता पूर्वपदावर आणण्याकरिता देवाने नियम प्रस्थापित केले. आज्ञा पाळली पाहिजे. ती पाळली गेल्यामुळे आशीर्वाद आणते, परंतु तीचे उल्लंघन केले तर त्रासाला आमंत्रण देते. त्यामुळे आज्ञांकडे आपण एका नव्या दृष्टीकोनातून पाहाणे गरजेचे आहे. आज्ञेचे प्रमाण तिचा उपयोग किंवा दुरुपयोग ज्या प्रकारे केला जातो त्यावर अवलंबून असतो.

जुन्या कराराच्या नियमांबद्दल पौल म्हणतो, "कोणी मनुष्य नियमशास्त्रांतील कर्मांनी नीतिमान ठरणार नाही, कारण नियमशास्त्राच्या द्वारे पापाचा बोध होतो" (रोम ३:२०).

### नव्या करारातील आज्ञा :-

नव्या करारातील आज्ञा, जुन्या करारातील आज्ञेहून पूर्णतया वेगळी आहे. ती जुन्या करारातील आज्ञेचे खंडन करीत नाही तर आदर करते. येशूने म्हटले "मी नियमशास्त्र रद्द करावयास नाही तर पूर्ण करावयास आलो आहे". येशू ख्रिस्ताच्या आगमनाने नियमशास्त्र जागा कृपेने घेतली. नव्या कराराने जो कृपेचा काळ आहे तो एका वेगळ्या जीवन दर्जाची अपेक्षा करीत आहे. जुन्या करारातील आज्ञापालन हे सक्ती आणि भितीमुळे करण्यात येत असे. परंतु नव्या करातात ती थोड्या योग्य भेद करणारी आणि प्रीतिच्या पायावर आधारीत आहे.

आज ख्रिस्तीजन त्यांच्या समस्यांनी घेरले गेलेले आहेत. मोहपाश आणि परिक्षांचा सामना करीत असताना ते क्षणात त्यांची इच्छाशक्ति गमावतात. देवाच्या अभिवचनांचा त्यांना विसर पडतो. बायबल म्हणते, "ज्याला आपल्या अशक्तपणाचे दु:ख होत नाही, असा आपला प्रमुख याजक नाही, तर तो सर्वप्रकारे आपल्याप्रमाणे पारखलेला होता. तरी निष्पाप राहिला" (इब्री ४:१५). दाविद संकटात असताना म्हणतो, "परमेश्वर माझा प्रकाश व माझे तारण आहे, मी कोणाची भीति बाळगू?" (स्तोत्र २७:१) देवाच्या अभिवचनांच्या विस्मृती वर एकच उपाय आहे आणि तो म्हणजे स्मरणात रहाण्याच्या मनाच्या निसर्गयुक्त शक्तिची वाढ करणे. मनुष्याच्या स्वभावाने ज्या गोष्टी आणि प्रसंग त्याच्या आवडीचे असतात त्याच त्याच्या स्मरणात रहातात. यावरुन आपल्याला हे समजणे गरजेचे आहे, की देवाचे स्मरण रहावयाचे असेल, तर एकमेव मार्ग आहे - त्याजवर प्रेम करणे.

शास्त्रांतील एकाने आज्ञे संबंधात विचारलेल्या प्रश्नाला येशूने उत्तरादाखल म्हटले, "हे इस्त्राएला श्रवण कर. आपला देव परमेश्वर हा अनन्य परमेश्वर आहे, तू आपला देव परमेश्वर याजवर पूर्ण मनाने, पूर्ण जिवाने, पूर्ण बुध्दीने व पूर्ण शक्तिने प्रिती कर" (मार्क १२:१९-३०). हा संदेश वाचत असलेल्या प्रत्येक वाचकाने लक्षात घेतले पाहिजे की येशू पहिल्या आज्ञेविषयी नियमाच्या तात्विक आणि तिच्या महत्वाच्या दृष्टिकोनातून बोलत आहे. पहिल्या भागात देवावर प्रीति करण्यास सांगण्यात आले आहे, हे तत्व असावे परंतु त्याचे महत्व प्रिती आहे. तो सांगत आहे तत्वाची किंमत किंवा महत्व हे देवावर (अ) पूर्ण शक्तिने, (ब) बुध्दीने, (क) जिनाने आणि (ड) मनाने प्रिती करावी.

आज्ञांचे पालन केल्या बरोबर शारिरीक आणि आत्मिक आशीर्वाद क्रमवारीने आपोआप येतात. जगीक आवश्यकतांविषयी बोलताना येशूने म्हटले, "तुम्ही प्रथम त्याचे राज्य व त्याची धार्मिकता मिळवावयाची खटपट करा, म्हणजे यांबरोबर तीही सर्व तुम्हांस मिळतील" (मत्तय ६:३३).

### ख्रिस्ताच्या आज्ञेचा समकालीन दृष्टीकोन

येशूने म्हटले, "जा आणि सुवार्तेची घोषणा करा". ही आज्ञा सर्व जगातील ख्रिस्तीजनां करिता आहे. त्यामुळे संत पौल असे म्हणतात, "... मी सुवार्ता सांगतो...... मी सुवार्ता सांगत नाही तर मला धिक्कार असो". (१ करिंथ ९:१६).

आजच्या या जगात सुवार्ता सांगणे हे पूर्वी पेक्षा अधिक प्रसंगोस्थित आहे. आपण जेथे कोठे जातो, त्या सर्व ठीकाणी आपल्याला लोक निराशावस्थेत, आज्ञा भंगलेले, फसविले गेलेल, जखमी, शांती रहित, दर्शनाविना आमि दिशाहीन असे पाहावयास मिळतात. जग चांगल्या बातमीच्या शोधात आहेत.

माझ्या बालपणी मी अनुभवलेला एक प्रसंग आठवतो. एके दिवशी मी शाळेतून घरी परतत असताना मी एक कावळा काही अन्नावर बसून

## बातमी

### "ख्रिस्ती शाळेला आग लावण्यात आली"

**मणिपूर:-** दि. २५ एप्रिल रोजी मणिपूरच्या काकचींग जिल्हातील एको शाळेच्या व्यवस्थापनाने शाळेतील सहा विद्यार्थ्यांना बेशिस्तीच्या वर्तनाबद्दल तात्पुरते बडतर्फ केल्यानंतर थोडक्यात दिवसानंतर शाळेला आग लावण्यात आली. या आगीत **सेंट जोसेफ हायर सेकंडरी स्कूलची** ३५ लाखांची मालमत्ता भस्ममात झाली. शाळेच्या आध्यापकांनी असा आरोप केला आहे की बडतर्फ विद्यार्थीनी कदाचीत स्थानिक विद्यार्थी संघटने बरोबर एकत्रीत येऊन हे दुष्कृत्य केलेले आहे. शाळेत १,४०० विद्यार्थी आहेत. ANI/NT

- (फोररनर जून २०१९)

**The details of our Bank Accounts are given below. Please inform us the details of your remittances.**

| Bank | Branch | Name | IFSC Code No. | Account Number |
|---|---|---|---|---|
| 1. STATE BANK OF INDIA | Triplicane, Chennai -5 | S. Sam Selva Raj | SBIN 0000249 | 102329 34679 |
| 2. ICICI BANK | Anna Salai, Chennai -2 | Echo of His Call | ICIC 0006038 | 6038 05022319 |

GREAT COMMISSION PARTNERS
ECHO OF HIS CALL MINISTRIES
SINCE 1969

# महान सेवाकार्याचे भागीदार

# प्रार्थना विनंत्या

ओझी वाहाणे (गलती ६:२),
गरजा भागविणे (रोम १२:१३),
आणि कार्यास गती देणे (२ तिमथी १:६)

**१९ सप्टेंबर २०१९ ते १८ ऑक्टोबर २०१९**

**(कृपया हे पान बाजूला काढून, सतत प्रार्थना करण्याकरिता तुमच्या पवित्र शास्त्रात ठेवा)**

## देव कार्यरत आहे !

### स्तुति करीता मुद्दे

**१९ सप्टेंबर** : **एको ऑफ हिज कॉलच्या** संपूर्ण टिम बद्दल देवाची स्तुती करु या.

**२० सप्टेंबर** : **एको ऑफ हिज कॉल सेवे**ला हातभार लावणाऱ्या सर्वांबद्दल देवाची स्तुति करु या.

**२१ सप्टेंबर** : दर रविवारी मुख्य उपासना मंदीरात पहाटे ५.३० वाजल्यापासून रात्री ८.०० वाजेपर्यंत पाच भाषांमध्ये होणाऱ्या सात उपासनांबद्दल देवाची स्तुति करु या.

**२२ सप्टेंबर** : वेलाचरी मंडळीत दर रविवारी दोन भाषांमध्ये होत असलेल्या उपासनां बद्दल स्तुति करु या.

**२३ सप्टेंबर** : आमच्या शुभवर्तमान मुद्रणालयात एकूण १६ भाषांमध्ये छापून मिशन क्षेत्रांमध्ये पाठविण्यात येत असलेले शुभवर्तमान साहित्य देव आशीर्वादीत करीत आहे. स्तुती करु या.

**२४ सप्टेंबर** : आमच्या मुख्य मंडळीत आणि आसपासच्या ठीकाणात होत असलेल्या मुलांमधील सेवेकरिता देवाची स्तुती करु या.

**२५ सप्टेंबर** : शुभवर्तमान ज्या भागांत पोहंचलेले नाही अशा ठीकाणांमध्ये ते नेण्याकरिता देव शक्य होऊ देत आहे. त्या साठी स्तुती करु या.

**२६ सप्टेंबर** : मुख्य मंडळीतील सल्लागार मंडळातील वडीलांबद्दल स्तुति करु या.

**२७ सप्टेंबर** : मुख्य मंडळीत पुरुष आणि स्त्रीयांमध्ये होत असलेली सेवा देव आशीर्वादीत करीत आहे. त्याबद्दल त्याची स्तुति करु या.

**२८ सप्टेंबर** : आमच्या नहेम्या बायबल कॉलेजसाठी देवाने अनुभवी व्याख्याते दिल्याबद्दल देवाची स्तुती करु या.

**२९ सप्टेंबर** : प्रभु परमेश्वराची स्तुती करु या. त्याने आमच्या मिशन क्षेत्रातील सर्व सेवकांचे आणि त्यांच्या सेवेचे रक्षण केले आहे.

**३० सप्टेंबर** : आमच्या सर्व प्रार्थना भागीदार, विश्वासातील, महान सेवा कार्यातील, स्वेच्छा दान देणारे आणि त्यांच्या कुटुंबियांबद्दल देवाची स्तुती करु या.

**०१ ऑक्टोबर** : देवाने मागील महिन्यातील **एको ऑफ हिज कॉल** सेवाकार्य आशीर्वादीत केले त्याबद्दल त्याची स्तुती करु या.

**०२ ऑक्टोबर** : देवाने आमचे वरिष्ठ पाळक पास्टर एस. सॅम सेल्वा राज आणि त्यांच्या कुटुंबियाचे सर्व दुष्ट शक्तिंपासून रक्षण केले आहे त्याबद्दल त्याची स्तुति करु या.

**०३ ऑक्टोबर** : देवाने आमच्या सर्व पाळकांना आणि त्यांच्या श्रमांना आशीर्वादीत केले त्याबद्दल स्तुती करु या.

### प्रार्थने करीता मुद्दे

**०४ ऑक्टोबर** : आमच्या नहेम्या बायबल कॉलेजातील सर्व विद्यार्थ्यांच्या उज्वल भविष्याकरिता प्रार्थना करु या.

**०५ ऑक्टोबर** : देवाने या महिन्यातील सेवाकार्यातील सर्व आर्थिक गरजा पुरवाव्यात.

**०६ ऑक्टोबर** : **एको ऑफ हिज कॉल** सेवेच्या विस्तारासाठी प्रार्थना करु या.

**०७ ऑक्टोबर** : शुभवर्तमान मुद्रणालयातील कर्मचाऱ्यांच्या कल्याणाकरिता प्रार्थना करु या.

**०८ ऑक्टोबर** : **नहेम्या बायबल** अभ्यासक्रम आणि प्रगत थियॉलॉजीकल अभ्यासक्रम (दोन्ही पत्र व्यवहाराद्वारे करण्यात येणारे) साठी प्रार्थना करु या.

**०९ ऑक्टोबर** : **एको ऑफ हिज कॉल** सेवा कार्यातील प्रार्थना करणाऱ्या आणि स्वेच्छा दानाद्वारे आधार देणाऱ्या आमच्या सर्व हितचिंतकांकरिता प्रार्थना करु या.

**१० ऑक्टोबर** : शुभवर्तमान न पोंहचलेल्या भागांपर्यंत ते नेण्याकरिता देवाने आमचे वरिष्ठ पाळक पास्टर एस. सॅम सेल्वा राज यांना दिलेल्या दर्शना बद्दल प्रार्थना करु या.

**११ ऑक्टोबर** : आमच्या मुख्य मंडळीतील आणि शाखा मंडळ्यांतील सर्व विश्वासणाऱ्या बंधु आणि बहिणी व लेकरांकरिता प्रार्थना करु या.

**१२ ऑक्टोबर** : जगभरातील सर्व देशांच्या अध्यक्षांकरिता, राष्ट्रपतींकरिता व पंतप्रधानांकरिता प्रार्थना करु या.

**१३ ऑक्टोबर** : मंडळ्या-मंडळ्यांमधील ऐक्यासाठी प्रार्थन करु या.

**१४ ऑक्टोबर** : जगातील सर्व तरुण लेकरांच्या रक्षणाकरिता प्रार्थन करु या.

**१५ ऑक्टोबर** : उत्तर प्रदेशातील सर्व मिशनऱ्यांकरिता प्रार्थना करु या.

**१६ ऑक्टोबर** : जगभरातील सर्व राजकरण्यांसाठी प्रार्थना करु या.

**१७ ऑक्टोबर** : पंजाब मधील लोकांकरिता व तेथील सेवेकांकरिता प्रार्थना करु या.

**१८ ऑक्टोबर** : **एको ऑफ हिज कॉल** सेवा कार्याकरिता समर्पित असे आणखीन अनेक सेवक मिळावेत यासाठी प्रार्थना करु या.

## महान सेवा कार्य भागीदारांची - कार्य केंद्रे

● **केरळ**-त्रिवेंद्रम, कोट्याम, थीरूवेल्ला, एर्नाकुलम ● **तामिळनाडू**-त्रिची, कोईम्बतूर, मदुराई, नागरकोईल, असारी पाल्लम, सेलम ● **पंजाब**-लुधीयाना ● **मध्यप्रदेश**-भोपाळ ● **जम्मू-काश्मीर**-उधामणूर ● **उत्तर प्रदेश**-लखनऊ ● **गुजराथ**-अहमदाबाद ● **बिहार**-झारखंड ● **पश्चिमबंगाल**-कोलकत्ता ● **नागालॅण्ड ओरिसा**-नयागड ● **आंध्रप्रदेश**-विशाखापट्टनम ● **महाराष्ट्र**-मुंबई ● **पॉण्डेचरी** ● **पाकिस्तान** ● **श्रीलंका** ● **बांगलादेश** ● **नेपाळ**

*(पान ४ वरून .....)*

ते खात असलेला पाहिला. परंतु थोडक्याच वेळात तो मोठ्याने काव-काव करुन इतर कावळ्यांना तो जे खात होता ते तो खाण्याकरिता जणू बोलाविण्याचा प्रयत्न करु लागलेला दिसला. त्यामध्ये मला एक सत्य सापडले, ते म्हणजे त्याचे त्याच्या इतर सहपक्षांवर कितीतरी प्रेम होते. आम्हाला अधोरेखीत करावयाचे ते म्हणजे प्रीती - प्रेम.

येशू म्हणतो प्रीती ही प्राथमिक अशी आज्ञा आहे, तो म्हणतो, दुसरी आज्ञा “जशी आपणावर तशी आपल्या शेजाऱ्यांवर प्रीती कर” यांहून मोठी दुसरी कोणतीही आज्ञा नाही. (मार्क १२:३१). येशू कदाचीत अशा अर्थाने म्हणत आहे की जर आपण पूर्णपणे प्रीती केली तर ती अगदी नकळत शेजाऱ्यांबद्दल प्रदर्शीत होईल. शेजाऱ्यांवर प्रीती केल्याशिवाय आपण देवा मी तुजवर प्रीती करितो असे त्याला बोलू शकत नाही. कारण येशू ढोंगी लोकांना प्रश्न विचारून धोक्याची सुचना देतो, “तुम्ही पाहात असलेल्या तुमच्या मित्रावर प्रीती करु शकत नाही, मग न पाहिलेल्या देवावर कशी काय प्रीती करु शकाल” देवाची प्रीती आमच्या अंत:करणावर व मनावर राज्य करो कावळ्याप्रमाणे, आपण देखील प्रीतीच्या माध्यमातून लोकांना देवाची सेवा करण्यांकरिता बाहेर बोलावू या.

## शेवट - सारांश

या जगाच्या तारणाऱ्या येशू ख्रिस्ताने आपल्याला ह्या धन्य सुवार्ता कार्यासाठी नेमिले आहे. ४ अब्ज आणि त्याही पेक्षा अधिक लोकांना येशूची गरज आहे हे लक्षात आणून आपल्या हृदयाला पाझर फुटू द्या. भारतात अद्याप ९४ करोड लोकांना येशूची ओळख व्हावयाची आहे. जा आणि शुभवर्तमान गाजवा. तुम्हाला शुभवर्तमान गाजविता येत नाही का ? तुमच्या, तुमच्या मित्राच्या, बहिणीच्या, भावाच्या, पालकांच्या, सहकाऱ्यांच्या जीवनात प्रभु परमेश्वराने काय केले त्याचे स्मरण करा. त्याने किती संध्या उपलब्ध करुन दिल्या ? देवाचा आत्मा कानांत तुम्हाला जाऊन कोणाला तरी येशू विषयी सांगण्याकरिता सांगत असताना त्याकडे बहिऱ्या सारखे किती वेळा वागलात?

ही तुमची वेळ आहे, ती जर चुकविली तर कदाचीत तुम्ही तुमच्या अनंतकालीक आनंदाच्या समयाला मुकाल. ब्लाइस पाक्सल अघोषीत शास्त्रज्ञाची एके समयी सुवार्तिकाशी भेट झाली. तो प्रसिध्दीच्या अत्युच्च शिखरावर असताना त्याने ख्रिस्ताचा स्विकार केला. त्या दिवसापासून तो सहशास्त्रण्यांना, मित्रांना आणि इतर सहकाऱ्यांना मोठ्या आवेशाने सुवार्ता सांगण्यास सुरवात केली. तो जास्त वर्षे जगला नाही, अगदी तारुण्याच्या दिवसात तो प्रभु मध्ये झोपी गेला. परंतु तो बालू शकला, “जे सुयुध्द ते मी केले आहे, धाव संपविली आहे, विश्वास राखिला आहे” (२ तीमथ्य ४:७).

जीवनात आपण दीर्घायुष्य गृहीत धरून चालत नाही. परंतु या जीवनात जर आपण प्रभु परमेश्वराकरिता जीवन जगलो तर अनंकालीक अविनाशी जीवन जगू अशी आशा बाळगतो. बायबल सांगते, “जे सेवक जिवेभावे देवासमोर वर्ततात त्यांच्याशी तो त्याच्या करारानुसार व दयेने वर्ततो” (१ राजे ८:२३). येथे चालणे म्हणजे त्याच्या सर्व आज्ञा विधींचे पालन करणे असा अर्थ होतो. प्रार्थनापुर्वक सुवार्ताप्रसार कार्य करा. ❖❖❖


**NEHEMIAH BIBLE COLLEGES**

**ECHO OF HIS CALL MINISTRIES** (ESTD.: 1969)

**Affiliated to Hindustan Bible Institute & College (HBI), Chennai**

**&**

**Recognised by the International Christian Leaders & Senior Pastors for the 50 Years!**

**RESIDENTIAL COLLEGE, Velachery**
**(Medium: English & Hindi)**
Course : Diploma in Theology,
Qualification : 10th Standard
Period : One year (with field and administrative trainings)

Golden Opportunity!
Don't miss!!
God is Calling you!!!

**EVENING COLLEGE, Chepauk & Santhoshapuram**
**(Medium : Tamil)**
Course : Diploma in Theology
*Monday, Tuesday & Thursday 6.30 PM to 8.30 PM*
(Evening Classes - Chepauk)
Qualification : 10th Standard
Period : One year (with special Seminars on holidays)

**Pastor S. Sam Selva Raj, Founder-President**

**For more details & application forms please contact :**

NEHEMIAH BIBLE COLLEGES

10, Mohammed Abdullah 2nd Street, Bells Road, Opp. Cricket Stadium, Chepauk, Chennai - 600 005, India.

**Phone : (+91-44) 2852 8282, 2852 9293, 2854 7766, Cell No : (+91) 95661 31858, 97908 05460**

**E.mail : sam@echoofhiscall.org / biblecor@yahoo.co.in Websites : www.echoofhiscall.org / www.echoofhiscall.com**

SOME IMPORTANT INSTRUCTIONS FOR LIVING A CHRISTAIN LIFE !

# ख्रिस्ती जीवन जगण्याकरिता काही महत्वाच्या सुचना !

एक व्यक्ति एखादा धंदा सुरु करण्या अगोदर त्यामध्ये यशस्वी होण्याकरिता त्या धंद्या विषयी जे काही शिकता येईल ते अगोदर शिकण्याची इच्छा बाळगते. अनेक ख्रिस्तीजन ख्रिस्ती जीवनाचे नियम शिकण्याचा कधीही त्रास घेत नाही. येशूने हे लक्षात घेऊन असे म्हटले, "या युगाचे पुत्र स्वजातीविषयी प्रकाशाच्या पुत्रांपेक्षा शहाणे असतात". (लूक १६:८). त्याच्या म्हणण्याचा अर्थ होता - मनुष्ये या जगातील गोष्टीविषयी देवाच्या लेकरांपेक्षा व्यवहार ज्ञान आणि दूरदर्शीपणा चटकन ग्रहण करितात. अर्थात पुढे येणाऱ्या जगाच्या बाबतीत, अगदी गरीब अशी ख्रिस्ती व्यक्ति जगातील सर्वात चतुर - शहाण्या व्यक्तिच्या तुलनेत शहाणी म्हणून ओळखली जाणार.

येशूने असे निर्देशीले की, जर एकाद्या इसमाने इमारत बांधण्याचा विचार केला तर त्याला सर्वप्रथम ती इमारत बांधून पूर्ण करण्यास एकंदर किती खर्च होईल आणि तितका पैसा स्वत:कडे आहे का हे लक्षात घेणे गरजेचे आहे. ख्रिस्तीजनांनी त्यांच्या सर्व व्यवहारात व्यवहार ज्ञानी असावे.

"बुरुज बांधावयाची इच्छा असता पहिल्याने बसून व खर्चाचा अंदाज करुन आपल्या जवळ तो पुरा करण्याइतकी ऐपत आहे की काय हे पाहत नाही असा तुम्हांत कोण आहे ? नाही तर कदाचीत पाया घातल्यावर त्याच्याने तो जर पुरा करवला नाही, तर सर्व पाहणारे लोक त्याच्या उपहास करुन म्हणतील, हा मनुष्य बांधू लागला परंतु ह्याच्याने तो पुरा करवला नाही" (लुक १४:२८-३०).

### नियमित प्रार्थना जीवन सुरु करा :

एखाद्या व्यक्तिला जर यशस्वी असा ख्रिस्ती व्हावयाचे असेल, तर त्याने त्यासाठी देवाने पुरविलेल्या गोष्टींचा उपयोग केला पाहिजे. उदा. सर्वप्रथम त्याने प्रार्थनेच्या जीवनास सुरुवात करावी. याला फार प्रकर्शाने महत्व देता येणार नाही. हि आश्चर्याची बाब आहे की, जे पुरुष किंवा स्त्रीया नियमितपणे प्रार्थना करीतात त्यांना जीवनातील गोष्टी पूर्ण करिता येतात. प्रार्थना हि देवाकडून गोष्टी प्राप्त करण्याचे साधन आहे. या संदर्भात येशूने असे अभिवचन दिले.

"मागा म्हणजे तुम्हांस दिले जाईल, शोधा म्हणजे तुम्हांस सापडेल, ठोका म्हणजे तुम्हांस उघडले जाईल, कारण जो कोणी मांगतो त्याला मिळते, जो शोधितो त्याला सापडते व जो ठोकितो त्यास उघडले जाईल" (मत्तय ७:७-८).

मार्क ११:२२-२४ या वचनात विश्वासाच्या सामार्थ्याबद्दल येशूने जे जाहिर केले त्याची नोंद घ्या.

"येशूने त्यांस उत्तर दिले, देवावर विश्वास ठेवा, मी तुम्हांस खचीत सांगतो, जो कोणी या डोंगराला, तू उपटून समुद्रात टाकिला जा, असे म्हणेल आणि आपल्या अंत:करणात संशय न धरिता आपण म्हणतो ते घडेल असा विश्वास धरील, त्याचे ते घडून येईल. यास्तव मी तुम्हांस सांगतो, जे काही तुम्ही प्रार्थना करुन मागाल ते तुम्हाला मिळालेच आहे असा विश्वास धरा, म्हणजे ते तुम्हांस प्राप्त होईल".

कदाचीत माझा तुम्हाला महत्वाचा सल्ला असा आहे की तुम्ही प्रार्थना ही नित्याची सवया करा. तुम्ही प्रत्येक दिवशी तुमच्या जीवनातील महत्वाच्या बाबी, तुमचे दररोजचे कार्यक्रम, तुमच्या आर्थिक समस्या, तुमचे कुटुंब, तुमचे काम, तुमच्या आशा, तुमचा धंदा हे सर्व प्रभु परमेश्वराकडे आणले पाहिजेत. हे जर तुम्ही विश्वासूपणे करीत राहिला तर तुम्हाला दिसून येईल की देवाने तुमच्या जीवनाकरिता तयार केलेल्या नमुन्या - बरहुकुम चालले आहे. हे लक्षात घ्या - प्रत्येकाच्या जीवनाकरिता देवाचा एक विशेष आराखडा आहे. तो त्या जीवना करिता शक्य असा आराखडा आहे. कदाचीत तो तुम्ही सेवेकरिता यावे यासाठी पाचारण असेल, मिशनरी व्हावे किंवा मंडळीत एक प्रशिक्षित कार्यकर्ता होण्याचा किंवा एक व्यवसायिक व्हावे यासाठी पाचारण असेल किंवा गृहीणी व्हावे. देवाची तुमच्या करिता एक परिपूर्ण इच्छा आहे, परंतु त्या आराखड्यात तुम्ही प्रार्थना पूर्वक सहभागी झाले पाहिजे. खेदाची बाब अनेक ख्रिस्तीजन देवापासून मिळणारे जे उत्तम ते चुकवतात. हे विवाहाच्या बाबतीत बहुतेकदा खरे आहे. जर एखाद्या व्यक्तिने विवाहाकरिता आग्रहाने प्रार्थना केली नाही, तर कदाचीत चुकीच्या जोडीदार/ जोडीदारीनी बरोबर विवाह होईल आणि परिणामी त्याचे/तीचे संपूर्ण जीवन प्रतिकुल परिस्थितीने बाधीत होईल. जीवनसाथी निवडण्याकरिता दुसऱ्या कल्पनेस किंवा तर्कास फारच थोडी जागा आहे. पहिल्या मंडळीतील लोक जसे प्रार्थनेला नियमित वेळ देत होते. (प्रे.कृ. ३:१). तव्दतच आपण त्यांचे अनुकरण करावे. यामुळे तुम्ही पुष्कळशा चुका करण्यापासून स्वत:स वाचवू शकाल.

या शिवाय आणखीन एक महत्वाचे काम कोणतीही ख्रिस्ती व्यक्ती करु शकते आणि ते म्हणजे इतरांकरिता, त्यांच्या समस्या आणि गरजांकरिता ती प्रार्थना करु शकते. ही मध्यस्थीचे सेवा आहे. मध्यस्थाची भूमिका बजावण्यासाठी असलेल्या पाचारणापेक्षा श्रेष्ठ असे दुसरे पाचारण नाही आणि हे बोलावणे सर्वांकरिता खुले आहे. ते तुझ्या करिता खुले आहे. प्रार्थनेच्या सामर्थ्याविषयी तुम्ही शिकला तर त्याचे उत्तर (यहेज्केल २२:३०-३१) या वचनात आहे.

"मी भूमीचा नाश करु नये म्हणून तिच्यांतला कोणी तट बांधील, कोणी मजसमोर देशासाठी तटाच्या खिंडीत उभा राहील की काय याची मी वाट पाहिली, पण कोणी मला आढळला नाही. ह्यामुळे त्यांजवर मी आपल्या क्रोधाचा वर्षाव करीन. मी आपल्या कोपाग्नीने त्यांस भस्म करीन, त्यांच्या आचाराचे प्रतिफळ त्यांच्याच शिरी आणीन असे प्रभु परमेश्वर म्हणतो".

दुसऱ्या शब्दात देव म्हणत आहे, लोकांनी

पुन: देवाकडे वळावे यासाठी प्रार्थना करणारा कोणीतरी सापडतो का ते पाहत होता. परंतु त्याला प्रार्थना करण्यारा कोणीही आढळा नाही. तेव्हा त्याने शिक्षा दिली आणि त्यांच्या दुष्टतेमुळे त्यांच्या भूमिचा नाश केला.

## दररोज बायबल वाचा :

बायबल खऱ्या अर्थाने - योग्य रित्या समजण्याकरिता त्याचा अभ्यास देव तुमच्याशी त्याच्या पवित्र वचनांद्वारे बोलत आहे अशी कल्पना मनात बाळगून करावा. आता पुस्तकाच्या लेखकाविषयी तो तुमचा स्वर्गीय पिता आहे हे तुम्हाला समजले - त्यामुळे त्याचे वाचन करीत असताना तुम्हाला मोठ्या प्रमाणात उत्तेजन आणि सुचना प्राप्त होईल.

बायबल मधील काही पुस्तके इतर पुस्तकांपेक्षा समजण्यास कठीण आहेत हे खरे आहे. बायबल जुना करार आणि नवा करार अशा दोन विभागांमध्ये विभागलेले आहे. जुना करार येशू ख्रिस्ताच्या पृथ्वीवर जन्म घेण्याच्या अगोदर लिहीला गेला. जुना करार आम्हाला देव पिढ्यांपिढ्यांच्या काळात मनुष्याशी कसा वर्तला याविषयी सांगतो आणि त्याच्या अनेक भागात येशू ख्रिस्त जो देवाचा पुत्र त्याच्या जन्म आणि मृत्यु बद्दल आणि तो मानवांच्या मुक्तते करिता येणार असल्याचे भविष्याच्याद्वारे सांगतो.

नवा करार येशू ख्रिस्ताच्या पृथ्वीवरील जीवन जगल्यानंतर त्याचा मृत्यु झाला आणि तो मृत्युतून पुन: जीवीत झाल्यानंतर लिहिला गेला. नव्या करारातील पहिल्या चार पुस्तकांना मत्तय, मार्क, लूक आणि योहान अशा नावाने ओळखले जातात आणि ती येशू खिस्तीविषयी आणि त्याच्या पृथ्वीवरील सेवे विषयी सांगतात. प्रत्येक ख्रिस्ती व्यक्तिने वाचनाची सुरुवात या पुस्तकांनी करावी. पुढील पुस्तक प्रेषिकांची कृत्ये हे पुस्तक येशू ख्रिस्ताच्या स्वर्गरोहणानंतर त्याच्या शिष्यांनी किंवा अनुयायांनी त्याचे कार्य कसे पुढे सुरु ठेविले आणि मंडळीची सुरुवात कशी झाली त्याविषयी सांगते. प्रे.कृ. आजच्या मंडळ्यांकरिता एक नमुना देत आहे. नव्या करारातील उर्वरीत पुस्तकांतील बहुतेक पुस्तके पौलाने पवित्र आत्म्याच्या मार्गदर्शनाने वेगवेगळ्या मंडळ्यांना लिहीली व त्याने मंडळ्यांना केलेल्या सुचना या जेवढ्या त्या काळांतील मंडळ्यांकरिता मुल्यवान होत्या तेवढ्याच त्या आताच्या मंडळ्यांकरिता आहेत.

नवा कराराचे वाचन अधुन मधुन न करता क्रमानुसार करावे. नवा करार हा तुमच्या ख्रिस्ती जीवनाकरिता मार्गदर्शक असा आहे.

नवा करार वाचून - अभ्यासून झाल्यावर तुम्ही जुना करार वाचण्यास सुरुवात करु शकता. त्यामध्ये तुम्हास स्त्री आणि पुरुष ज्यांनी देवाची सेवा केली आणि केली नाही त्यांच्या विषयी व देव त्यांच्याशी कसा वागला त्याविषयी वाचावयास मिळते. देवाजवळ मागा की त्याने वचने स्पष्ट करावीत. यासाठी की जुन्या करारातील महत्वाची शिकवण शिकता यावी. नवा करार हा विशेषत: आपण जे मंडळी युगातील खरे विश्वासणारे आहोत त्या आपणाकरिता लिहिण्यात आला होता. त्यामुळे आपल्याला त्यामध्ये मोठ्या प्रमाणात मदत मिळते. ख्रिस्ती व्यक्तिने दिवसाला कमीत कमी तीन अध्यायांचे वाचन करावे. वचनांचे स्पष्टीकरण करण्याकरिता तुमच्या पाळकांना शास्त्राभ्यास गट सुरु करण्यास सांगा. त्या द्वारे तुम्हाला असा अनुभव प्राप्त होईल. शास्त्राभ्यास गटात सामील होऊन देखील. जर देवाची इच्छा समजण्यास काही अडचण भासत असेल तर पवित्र आत्म्याला तुमचे मार्गदर्शन करण्याची विनंती करा.

## देवाचे देणे देण्यात विश्वासू असा :

बायबल याकोब ज्याच्या जीवनात अतिशय असुखावह अशा गोष्टी होत्या. त्याविषयी सांगते की त्याची क्षुद्र वृत्ती अधीकच वाढली इतकी की सरतेशेवटी देवाला त्याच्या जीवनात जावे लागले. एके दिवशी फसविण्याच्या कृतिमुळे तो भयंकर अशा संकटात पडला, त्याला घर सोडून पळावे लागले. परंतु त्या रात्री देवाने त्याला स्वर्गाचे दर्शन दिले. त्या दर्शनामुळे त्याचे जीवन बदलले, आणि त्याच क्षणी - त्याच ठीकाणी त्याने त्याच्या उत्पन्नातून विश्वासूपणे दशमांश देण्याचे देवाला वचन दिले.

“याकोबाने असा नवस केला की देव मजबरोबर राहून ज्या वाटेने मी जात आहे तीत माझे संरक्षण करील आणि मला खावयास अन्न व घालावयास वस्त्र देईल आणि मी आपल्या पितृग्रही सुखरुप परत येईन, तर परमेश्वर माझा देव खरा, आणि हा जो धोंडा मी स्मारकस्तंभ म्हणून उभा केला आहे त्याचे देवमंदिर होईल, आणि ज् अवघे तू मला देशील त्याचा दशमांश मी तुला अवश्य देईन” (उत्पत्ती २८:२०-२२).

हे दु:खदायक सत्य आहे की, उघडपणे स्वत: ख्रिस्ती असल्याचे जाहीर सांगणारे इतके हावरट - अतृप्त आहेत की ते त्यांचा दशमांश देत नाहीत. देव त्यांना ठग - चोर म्हणतो. त्यांनी माणसांना ठकविले नाही, तर देवाला ठकविले.

“मनुष्य देवाला ठकवील काय ? तुम्ही तर मला ठकविले आहे, असे असून तुम्ही म्हणता आम्ही कोणत्या बाबतीत तुला ठकविले आहे? दशमांश व अर्पणे यासंबंधाने तुम्ही शापाने शापग्रस्त आहा, कारण तुम्ही अवघ्या राष्ट्राने मला फसविले आहे. सेनाधिश परमेश्वर म्हणतो, माझ्या मंदिरात अन्न असावे म्हणून सगळा दशमांश तुम्ही भांडारात आणा, म्हणजे मी आकाशकपाटे उघडून जागा पुरणार नाही एवढा आशीर्वाद तुम्हाकरिता वर्षितो की नाही याविषयी माझी प्रतीति पाहा” (मलाखी ३:८-१०).

उलट जे विश्वासू कारभाऱ्याप्रमाणे त्याला त्यांचे देणे देतात. त्यांना यावर विशेष आशीर्वादांची वृष्टी करण्याचे आश्वासन दिले आहे. दशमांश म्हणजे आपल्या कमाईतून किंवा पगाराद्वारे किंवा क्रयविक्रीतून मिळालेल्या मिळकतीतून दहावा भाग देवाला देणे. जे काही आपल्याकडे आहे ते सर्व देवाकडूनच आपल्याला प्राप्त झालेले आहे आणि तो त्याच्या कार्याकरिता केवळ दहाव्या भागाची अपेक्षा करीत आहे.

देवाच्या कार्याकरिता आधार हा सर्वप्रथम आला पाहिजे. प्रत्येक वेळी जे पैसे किंवा वस्तु तुम्हाला तुमच्या कामामधुन किंवा विक्रीतुन मिळतात, देवाची इच्छा आहे का त्यातून सर्वप्रथम त्या सर्वांचा दशमांश त्याला द्यावा.

जागतीक मिशन कार्याबद्दलची ख्रिस्ती या नात्याने आपली जबाबदारी आपण टाळू नये याकडे दुर्लक्ष करु नये. ज्यांनी ख्रिस्ताला अद्याप ओळखले नाही त्यांचे आपण ऋणी आहोत. येशूने म्हटले, “संपूर्ण जगात जा आणि उघडपणे प्रत्येक व्यक्तिला सुवार्तेची घोषणा करा” देव तुम्हाला कदाचीत मिशनरी म्हणून किंवा पाळक म्हणून बोलाविल. जर नाही, तर इतर कोणीतरी संदेश घेऊन जाणे शक्य व्हावे त्याकरिता मदत करण्याची जबाबदारी तुमची आहे.

देव करो आणि तुम्हाला आशीर्वाद देवो.

❖❖❖



# PIT TO PALACE
# खड्यातून महालापर्यंतची मालिका
## (रेव्ह. सॅम सेल्वा राज यांच्या जीवनांतील अनुभव)
"जो कोणी बुध्दिमान् असेल त्याने ह्या गोष्टींकडे लक्ष पुरवावे" (स्तोत्र १०७:४३(अ))

## "... देव ....पाहून देईल" (उत्पत्ती २२:८)
## "....... परमेश्वर पाहून देईल" (उत्पत्ती २२:१४)

चेन्नई, मद्रास शहरातील ज्या लोकांना देवाचे सामर्थ्य आणि त्याच्या सेवकांच्या शक्तिची कल्पना नव्हती मला अशा लोकांपासून होणाऱ्या पुष्कळशा समस्या आणि त्रासांना सामोरे जावे लागत होते. या विभागात मी आणि माझे कुटुंब केवळ ख्रिस्ती असल्यामुळे विभागातील लोकांकडून भयंकर अशा दडपणाखाली आणि त्रासात रहावे लागत होते. इतर लोक जसे त्यांच्या घरासमोर त्यांचे वाहन उभी करीत असत, तसे आमचे वाहन आम्हाला आमच्या इमारती पुढे उभे करु देत नव्हते.

शेजारील इमारत अतीशय जुनी आणि आतून व बाहेरून मोडकळीस आलेल्या अवस्थेत होती. त्या इमारतीचे पाण्याचे आणि सांडपाण्याचे पाईप फुटलेले असल्यामुळे आमच्या इमारतीची भिंत ओली होऊन पुष्कळशी पडझड होऊ लागली.

एकदा त्या इमारतीचा मालक काही गुंड प्रवृत्तीच्या लोकांना घेऊन मजकडे आला व उलट आरोप करु लागला की आमच्या इमारतीच्या गळतीमुळे त्यांच्या इमारतीचे नुकसान झाले आहे. त्याच्या सोबतचे लोक मोठ्या आवाजात भांडू लागले आणि शेजारच्या लोकांना गोळा केले व मजकडे इमारतीची दुरुस्ती व रंगकाम करण्यासाठी मोठ्या रकमेची मागणी करु लागले. माझ्याकडे त्यांना देण्यासाठी तेवढे पैसे नव्हते. गोळा झालेल्या लोंकापैकी काहीजण बोलू लागले की त्यांची मागणी योग्य नाही. परंतु ते ऐकण्याच्या मन:स्थितीत नव्हते. त्यांनी रविवारच्या उपासनेत गडबड करण्याची धमकी दिली. आमच्या मंडळीतील सभासदांना देखील त्यांची मागणी मान्य नव्हती.

मी माझ्या प्रार्थनेच्या खोलीत गेलो व देवाला विनंती केली की, त्याने देवदुतांना पाठवून त्या त्रास देणाऱ्या लोकांचा न्याय करावा.

मी प्रार्थना करीत असताना देवाने माझ्या जीवनात दखल घेतली. त्याने मला पास्टर जी सुंदरम यांनी मला शिकविलेल्या वाक्याची आठवण करुन दिली - "इतर करतील.... परंतु आपण करु नये...." देवाने मला त्या इमारतीच्या मालकाने मागणी केल्यानुसार दुरुस्ती करुन देण्यास भाग पाडले आणि देवाने मला अशी देखील खात्री करुन दिली की जर मी त्याचे म्हणणे काटेकोरपणे पाळले, तर तो मला तीच इमारत एके दिवशी खरेदी करण्यात मदत करणार. मी प्रभुची आज्ञा पाळली व शेजारील इमारतीची दुरुस्ती करुन मालकाचे समाधान केले. इमारत दुरुस्तीच्या खर्चामुळे मजवर फार मोठे आर्थिक ओझे झाले आणि मी अतिशय दु:खीत झालो. परंतु देवाने मला तो खात्रीने पुरवठा करणार हे समजण्यास मदत केली.

सहा महिन्याच्या कालावधी नंतर देवाने मला तीच इमारत मी केलेल्या दुरुस्ती सहीत खरेदी करण्यास मदत केली. ती इमारत खरेदी केल्या बरोबर ती आमच्या इमारती बरोबर जोडून एक मोठी इमारत करण्यास मदत केली.

आपला देव किती अभ्दुत आहे !!

आपण कितीतरी आशीर्वादीत आहोत !!

❖❖❖

## एको ऑफ हिज कॉल
### (पत्रव्यवहारद्वारा अभ्यासक्रम)
### बायबल कोर

आम्ही पवित्र शास्त्रातील मुलभूत सत्यांवर आधारीत शास्त्राभ्यास देतो. अभ्यासक्रमासाठी **न्यु लाईफ फॉर यू** नावाचे पुस्तक तुम्हाला पुरविण्यात येईल. अभ्यास क्रम पूर्ण केल्यानंतर तुम्हाला एक प्रशस्तीपत्र देण्यात येईल. यासाठी कोणत्याही प्रकारची सक्तीची फी आकारली जात नाही.

### पत्रव्यवहाराद्वारे थियॉलॉजी अभ्यासक्रम

आता पत्रव्यवहाराद्वारे थियॉलॉजी अभ्यासक्रम ॲडव्हान्स स्वरुपात पास्टर आणि ख्रिस्ती पुढारी सुध्दा या अभ्यासक्रमाचा लाभ घेऊ शकतात. कोर्सची फी १००० रु. आकारली जाईल. १४२ प्रकरणे असलेली ७ पुस्तके यात समाविष्ट आहेत. यशस्वी विद्यार्थ्यांना पदवी देण्यात येईल.

अधिक माहिती करिता कृपया लिहा :

**The Chairman, Nehemiah Bible College, Echo of His Call**
10, Mohammed Abdullah 2nd Street, Opp. Cricket Stadium,
Chepauk, Chennai - 600 005, India.
**Ph.: (044) 2852 8282, 2852 9293, 2854 7766, Cell : (+91) 95661 31858**
**97908 05460 E-mail : biblecor@yahoo.co.in**

RNI NO. 70106/98, Postal Regn. No. TN/CH/(C)/206/18-20 WPP NO. TN/PMG(CCR)/WPP-261/18-20

# ECHO OF HIS CALL

Monthly magazines in 16 languages, Bible Colleges, Postal Courses, Church Planting, Village English High School, Gospel Printing Press, Crusades, Seminars, Social Services, etc.

**Annual Subscription : Rs. 100/-**
**Life Subscription : Rs. 2000/-**

The Multifarious activities of **Echo of His Call Ministry** is supported by the free-will offeerings and donations of the God's children like you. You may support Echo of His Call and its activities as the Lord leads you. We need your help to send forth the Gospel to the unreached people and plant Churches.

If you would like to receive **ECHO OF HIS CALL** magazines regularly, please write to us. Whenever you change your postal or e-mail addresses, please do inform us your old and new address.

**Echo Of His Call** is available in 16 langues in our websites also. You can read it by going into the site as well as downloading it and get bleassed.

Your letters, prayer requests and your financial helgs (by D.D., Cheque, M.O. etc) to **ECHO OF HIS CALL** may be seat to the address below

Please send your **Land Phone / Cell Phone Numbers and E.mail addresses for updation.**

## ECHO OF HIS CALL

10, MOHAMMED ABDULLAH STREET, CHEPAUK
CHENNAI-600 005, INDIA
PH:(+91-44) 2852 8282, 2852 9293, 2854 7766,
Cell:(+91) 95661 31858 / 97908 05460
E-mails: sam@echoofhiscall.org
biblecor@yahoo.co.in
Websites: www.cchoofhiscall.org/
www.echoofhiscall.com
YOU CAN SEND YOUR DONATIONS ON ONLINE ALSO

## आमच्या मुख्यालयातील सेवाकार्या करीता कृपया प्रार्थना करा :-

१. प्रार्थना सेवा : २४ तास
२. **बायबलकोर** - पत्रव्यवहाराद्वारे बायबल अभ्यासक्रम : इंग्रजी, तामीळ, हिन्दी
३. **एको ऑफ हिज कॉल** - मासिक :
इंग्रजी, तामिळ, मल्यालम, तेलगु, हिन्दी, कन्नडा, मराठी, गुजराती, बंगाली, उडीया, नेपाळी, आसामी, पंजाबी, उर्दु, सिंहली आणि आफ्रिकन
४. नहेम्या बायबल कॉलेज : (दोन केंद्रे)
५. पत्रव्यवहाराद्वारे थियॉलॉजीकल अभ्यासक्रम : इंग्रजी आणि तामिळ
६. महान सेवा भागीदार (नेटवर्क ऑफ पास्टरस)
७. प्रशिक्षण कार्यक्रम
८. धर्मसभा
९. हस्तपत्रिका वितरण आणि मागोवा (पाठपुरावा)
१०. शुभवर्तमान साहित्य छापण्याचा मुद्रणालय
११. सेंट पॉलस् मॅट्रिक्युलेशन स्कूल : गावातील इंग्रजी शाळा

| | | |
|---|---|---|
| १२. | शब्बाथ शाळा | : सकाळी ८.३०वा. आणि सायं. ४ वा. |
| १३. | **तामिळ उपासना** | : ५.३० वा. पहाटे, ७ वा. सकाळी आणि १० वा. सकाळी |
| १४. | मल्यालम उपासना | : रविवारी दुपारी ३ वा. |
| १५. | तेलगू उपासना | : रविवारी दुपारी ४ वा. |
| १६. | हिन्दी उपासना | : रविवारी सायंकाळी ५ वा. |
| १७. | इंग्रजी/तामिळ उपासना | : रविवारी सायंकाळी ६ वा. |
| १८. | पाळकांचे समोपदेशन | : रविवारी दुपारी ४ वा. |
| १९. | स्त्रियांची प्रार्थना | : बुधवारी सायंकाळी ५.३० वा. |
| २०. | प. शास्त्राभ्यास | : बुधवारी सायंकाळी ६.३० वा. |
| २१. | पुरुषांची प्रार्थना | : शुक्रवारी सायंकाळी ७ वा. |
| २२. | कर्मचाऱ्यांची सभा | : शनिवारी सांयकाळी ६ वा. |
| २३. | गृह प्रार्थना सभा | : सोमवार/मंगळवार सांयकाळी ६.३०वा. |
| २४. | विशेष पवित्र सहभागीता | : प्रत्येक महिन्याच्या पहिल्या दिवशी पहाटे ५.३० वा. |
| २५. | सेवकार्याचे सिंहावलोकन | : पहिला शनिवार सांयकाळी ६.३०वा. |
| २६. | पालकांची प्रार्थना | : पहिला रविवार दुपारी ४ वा. |
| २७. | रात्रीची प्रार्थना | : दुसरा शुक्रवार रात्रौ ९.३० वा. |
| २८. | उपवास प्रार्थना | : पहिला शनिवार सकाळी ९.३० वा. |
| २९. | पवित्र सहभागिता | : दुसऱ्या रविवारच्या उपासनांमध्ये |
| ३०. | सकाळचे मनन | : दररोज पहाटे ५.३० वा. |
| ३१. | कर्मचारी मनन | : दररोज सकाळी ९ वा. |
| ३२. | कार्यालय | : सकाळी ९ ते रात्री ९ वा.(रविवार सोडून) |

**RNI NO. 70106/98**
**Postal Regn. No. TN/CH/(C)/206/18-20**
**WPP NO. TN/PMG(CCR)/ WPP- 261/18-20**
**Date of Publication: Second week of every month**
**Date of Posting : 11th & 12th of every month**
**Posted at "Egmore RMS / 1 Patrika Channel"**
**on 12th OCTOBER 2020**
**If un-delivered please return to:**
**ECHO OF HIS CALL (MARATHI)**
**P.O. Box No. 2957,**
**Chepauk, Chennai - 600 005, INDIA.**
**Phone: (+ 91- 44) 2852 8282, 2852 9293, 2854 7766**

***JESUS LOVES YOU!***

**To**

*GOD BLESS YOU!*

Owned and published by **S. Sam Selva Raj** from No.18, Mohammed Abdullah Street, Chepauk, Chennai-600 005 and printed by him at **Echo of His Call Printers** No. 18, Mohammed Abdullah Street, Chepauk, Chennai-600 005. Editor: **S. Sam Selva Raj.**